महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ
दालन क्र.५२७ व ५२८, ५ वा मजला,
कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई-४००६१४.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ २७५७९४६३. ई-मेल : sickonkan@gmail.com
संकेतस्थळ : www.sic.maharashtra.gov.in

माहितीचा अधिकार

क्रमांक :- मरामाआ-२०२४/प्र.क्र.२२/को.खं/आस्था दिनांक:- १०/०८/२०२६

**सेवानिवृत्त गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गातील अधिका-यांच्या सेवा करार तत्त्वावर घेण्याबाबत**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कोंकण खंडपीठ कार्यालयामध्ये निम्नलिखित विवक्षित कामकाजासाठी मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील/राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागातून गट- ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या एका अधिकाऱ्याची करार पध्दतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करावयाची आहे.

अ) सद्य:स्थितीत आयोगाकडील सर्व प्रलंबित/प्राप्त होणाऱ्या प्रकरणांवर मा. राज्य माहिती आयुक्त यांच्या निर्देशानुसार कार्यवाही करावयाची आहे/विवक्षित कामे करावयाची आहेत. सदर विवक्षित कामाअंतर्गत सन २०२३ ते सन २०२६ या कालावधीत आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपील/तक्रारीचे जिल्हानिहाय तसेच प्राधिकरण/कार्यालय निहाय वर्गीकरण, अपील/तक्रारीचे संबंधित अधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त करून घेणे व प्राप्त माहितीच्या आधारे अपील/तक्रारी वर तातडीने कार्यवाही करणे, ते संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे व त्यापुढील कार्यवाही करणे तसेच अपील/तक्रारीची पडताळणी करून त्रुटीपूर्ण/अनियमित/मुदतबाहय/मुदतपूर्व/विनाकार्यवाही अपील/तक्रार याबाबत कामकाज करणे अशी वरिष्ठ अधिकारी यांचे निर्देशानुसार विविध कामे याअंतर्गत करावयाची वेगवेगळ्या टप्प्यावरील कामांचा समावेश आहे.

२. उपरोक्त विवक्षित कामासाठी सेवानिवृंत्त अधिकाऱ्याची सेवा करार पद्धतीने १ वर्षाकरिता घेण्याकरिता आवश्यक सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक.सीबीई १५२५/प्र.क्र.३७/आस्थामं(का.१३) दिनांक १०/६/२०२५ मधील अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त गट ब (राजपित्रत व अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | संवर्ग | भरावयाची संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | सेवानिवृत्त गट ब (राजपित्रत व अराजपत्रित) संवर्ग | १ | मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील/राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागातील कामकाजाचा (गट ब राजपित्रत व अराजपत्रित पदावरील) किमान ३ वर्षाचा अनुभव |

वरील कामाकरिता इच्छुक सेवानिवृत्त गट ब (राजपित्रत व अराजपत्रित) संवर्गातील एका अधिकाऱ्याची सेवा करार पद्धतीने प्रथमतः १ वर्षाकरिता घेण्यात येईल व आवश्यकतेप्रमाणे सदर कालावधी करारान्वये वाढविण्यात येईल. मात्र असा एकूण कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त असणार नाही. उक्त शासन निर्णयाची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०६१०१२५३३५९१०७ असा आहे.

वरील प्रमाणे करार पद्धतीने घेतल्या जाणाऱ्या सेवानिवृत्त गट ब (राजपित्रत व अराजपत्रित) संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा कराराच्या अटी व शर्ती तसेच मासिक पारिश्रमिक भत्ते हे सामान्य प्रशासन विभागाच्या उक्त शासन निर्णय दिनांक १०/६/२०२५ मध्ये नमूद केल्यानुसार व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणानुसार राहतील.

तरी इच्छुक उमेदवाराने त्यांचा अर्जासहित बायोडाटा आवश्यक कागदपत्रांसह, सहसचिव, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, दालन क्र.५२७ व ५२८, कोंकण भवन, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांना **दिनांक १८/८/२०२६ पर्यंत** पोहोचतील अशा बेताने समक्ष **अथवा** टपालाद्वारे सादर करावा विहित दिनांका नंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अर्जाचा विहित नमुना www.maharashtra.gov.in या शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर सविस्तरपणे उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

**(रीना फणसेकर)**
**सह सचिव तथा प्रादेशिक कार्यालयप्रमुख**
**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कोंकण खंडपीठ**

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

| गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी विवक्षित कामासाठी करार पध्दतीने नियुक्तीसाठी करावयाचा अर्ज | पासपोर्ट साईज फोटो |
|---|---|
| उमेदवाराचे संपूर्ण नाव | |
| पत्र व्यवहाराचा पत्ता व ई-मेल:- | |
| दूरध्वनी क्रमांक /भ्रमणध्वनी क्रमांक | |
| जन्म दिनांक व दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी असलेले वय :- | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक व सेवानिवृत्तीच्या वेळेस धारण केलेले पद | |
| प्रवर्ग | |
| सेवानिवृत्ती वेतन घेत असलेल्या बँकेचे नाव, खाते क्रमांक :- | |
| शैक्षणिक अर्हता- अर्हता, बोर्ड / विद्यापीठाचे नाव, उत्तीर्ण वर्ष, टक्केवारी, श्रेणी याबाबतच्या तपशीलासह | |
| संगणक व इतर अर्हता : | |

| | |
|---|---|
| शासकीय / महाराष्ट्र राज्य माहिती आयोगातील कामकाजाचा अनुभव (याबाबत पदनाम ,कालावधी, केलेल्या कामाचा स्पष्ट तपशील नमूद करावा) | |

| |
|---|
| प्रमाणित करण्यात येते की उपरोक्त नमूद माहिती सत्य व अचूक असून निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा नियुक्तीनंतर उपरोक्त माहिती पैकी कोणतीही माहिती असत्य चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास माझी निवड कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यास पात्र असल्याची आणि त्याबाबत कायदेशीर कार्यवाही होऊ शकते याची मला पूर्ण जाणीव आहे. |
| कंत्राटी पदावरील नियुक्तीच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे सदर नियुक्ती पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील नियुक्ती असल्याची मला जाणीव असून सदर नियुक्तीमुळे शासनातील कोणत्याही पदावर माझा धारणा अधिकार हक्क निर्माण होत नाही. मी नमूद केलेल्या तपशिलाच्या सत्यप्रती मला मागणी केल्यास मी सादर करण्याची हमी देत आहे |

उमेदवाराचे नाव व स्वाक्षरी

दिनांक

स्थळ

* वरील प्रमाणे नमूद सर्व कागदपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रति जोडणे आवश्यक